॥ मनाच्या धुंदीत, लहरीत ये ना ॥

गायकः जयवंत कुळकर्णी
गीतः शांता शेळके
संगीतः देवदत्त साबळे

मनाच्या धुंदीत, लहरीत ये ना
सखे ग साजणी, ये ना !
जराशी सोडून जनरीत ये ना
सखे ग साजणी, ये ना ! ॥ धृ. ॥
चांदणं रुपाचं आलंय भरा
भोळा स्वभाव तुझा लाजरा ।
माझ्या शिवारी ये तू जरा
चारा घालीन तुज पाखरा ।
माझे डोळे शिणले ग तुझी वाट पाहुनी

गुलाबी गालांत हासत ये ना
सखे ग साजणी, ये ना !
जराशी लाजत मुरकत ये ना
सखे ग साजणी, ये ना ! ॥ १ ॥

आता कुठवर धीर मी धरू ?
काळिज करतंय बघ हुरहुरू ।
सजणे नको ग मागं फिरू
माझ्या सुरांत सुर ये भरू ।
माझे डोळे शिणले ग तुझी वाट पाहुनी

बसंती वाऱ्यात, तोऱ्यात ये ना
सखे ग साजणी, ये ना !
सुखाची उधळीत बरसात ये ना
सखे ग साजणी, ये ना !

शिवारः गावाच्या हद्दी पलिकडली जागा